**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १३५५/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.प्रभाकर रघुनाथजी बरांगे,
व्दारा एस.व्हि.बरांगे, सायली दुध डेअरी,
पवन नगर (गोपाल नगर), अमरावती.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सिनियर मॅनेजर (Legal), सिकॉम लिमिटेड,
"निर्मल" पहिला माळा, नरिमन पॉईंट, मुंबई.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
विभागीय व्यवस्थापक, सिकॉम लिमिटेड,
उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपुर.

**(आदेश पारीत दिनांक १९/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.प्रभाकर रघुनाथजी बरांगे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे सहाय्यक, सिकॉम लिमीटेड, विभागीय कार्यालय, नागपुर श्री.डि.एच. साहु हे हजर आहेत.

सदर प्रकरणात मागील तारखेला म्हणजे दिनांक १८/०८/२००१० ला पुढिल तारीख १८/११/२०१० ठेवण्यात आली होती . सदर प्रकरणात सुप्रीम कोर्टात SLP दाखल केली आहे व त्याचा क्रमांक ४०३१/२०१० असा आहे व सदर प्रकरणात दिनांक १५/०२/२०१० ला याचिकेमध्ये नोटीस काढुन दिनांक २६/०६/२०१० ला मुख्य माहिती आयुक्तांनी जो आदेश दिला त्यावर स्टे आहे. सदर प्रकरणात या आयोगाने आज रोजी प्रकरण ठेवुन असे अपेक्षित होते की, सदर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात काहीतरी आदेश पारीत होईल व त्यानंतर हया आयोगास आदेश पारित करणे सोईचे होईल. परंतु आज रोजी चौकशी केली असता सदर प्रकरण अजुनही सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे असे दिसुन येते. सदर प्रकरणाचे अनुषंगाने स्टे असल्यामुळे सदर अपिल निकाली काढण्यात येते व त्यानंतर जर सदर प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने SLP खारीज केले किंवा स्टे व्हॅकेट झाला तर अर्जदार प्रपत्र 'अ' दि.०४/०७/२००९ नुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाला माहिती मागतील. अर्जदाराला संबंधित प्राधिकरणाकडुन काही माहिती मिळाली नाही तर अर्जदार कलम १८ खाली या आयोगाकडे तक्रार करु शकतात.

वरील बाबी लक्षात घेता सदरचे अपिल प्रलंबित ठेवणे उचित नाही.

यास्तव वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १८६ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.राजेश मुगुटराव पाचडे,
मु.पो.आसेगांव बाजार, ता.अकोट,
जि.अकोला.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अकोला, जि.अकोला.

२. जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अकोला, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक १९/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अकोला श्री.जी.जे. जाधव हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराने माहितीकरिता अर्ज केला व माहिती व्यक्तीशः मागितली. अर्जदाराला माहिती घेवुन जाण्याकरिता पत्र दिल्यानंतरही अर्जदार माहिती नेण्याकरिता हजर राहीले नाही. त्यानंतर अर्जदाराने दिनांक १८/११/२००९ नुसार शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलाची सुनावणी दिनांक १४/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली व सुनावणीस हजर राहण्याकरिता दिनांक ०४/१२/२००९ ला कळविण्यात आले परंतु अर्जदार सुनावणी गैरहजर असल्यामुळे सदर प्रकरणात कोणतीही कार्यवाही झाली नाही. अर्जदाराचे व्दितीय अपिल पाहता अर्जदार नियमानुसार अर्ज दाखल केला परंतु माहिती अधिकारी यांनी माहिती पुरवीली नाही असे कारण नमुद आहे.

तरी, अर्जदाराला रजिष्टर डाकेने पत्र देवुन माहिती तयार आहे व व्यक्तीशः येवुन माहिती घेवुन जावी असे कळविण्यात यावे. अर्जदार त्यानंतर १५ दिवसात आले नाही तर अर्जदाराला माहितीची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढण्यात येवुन अपिल नस्तीबध्द करण्यात यावे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १९२ / २०१०**
**अपिल क्र. १९२(१)/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.एन.बी. गुघाने,
रा.अग्रवाल ले-आऊट, यवतमाळ.
**विरुध्द**
**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ,
अमरावती जि.अमरावती.
**२.** जन माहिती अधिकारी तथा
महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळ,
अमरावती जि.अमरावती.
**३.** जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जिवन प्राधीकरण बांधकाम विभाग,
गोधनी रोड, यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक १९/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे श्री.एन.बी. गुघाने हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण मंडळ, अमरावती श्री.व्ही.एन.राठोड हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड.श्री.जि.एच. खेतकडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण मंडळ, अमरावती श्री.आर.एस. डकरे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण, यवतमाळ श्री.एस.वाय. वाघ हे हजर आहेत.

सदर प्रकरणात प्रथम अपिल निकाली काढण्यात आले नाही ही बाब उभयपक्षांना मान्य आहे.

अपिलीय अधिकारी यांचे म्हणण्यानुसार सदर प्रकरणात नोटीस काढण्यात आली होती परंतु अर्जदार सुनावणीकरिता आले नाही, त्यामुळे अपिलात सुनावणी देण्यात आली नाही. अर्जदाराचे म्हणण्यानुसार सदर प्रकरणात नोटीस उशिरा मिळाल्यामुळे अर्जदार सुनावणीस हजर राहु शकले नाही.

तरी हया बाबत तोडगा म्हणुन सदर प्रकरणात दिनांक २९/११/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात सुनावणी ठेवण्यात यावी. अर्जदार व जन माहिती अधिकारी हे प्रथम अपिलीच्या सुनावणीस हजर राहतील. अर्जदाराने दिनांक ०४/१२/२००९ नुसार मागितलेली माहिती सुनावणी घेवुन देण्यात यावी. तसेच अर्जदाराला माहिती दिली किंवा नाही याबाबत शहानिशा करुन प्रथम अपिलीय अधिकारी नियमानुसार विस्तृत आदेश पारीत करतील. तसेच सदर प्रकरणात पत्रव्यवहार कलम ७ नुसार केला किंवा नाही याची शहानिशा करावी व अर्जदाराला माहिती विनामुल्य की मुल्य आकारुन दयावी याबाबत सुध्दा प्रथम अपिलात निर्णय घेण्यात यावा.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवुन १० दिवसाचे आंत आदेश पारीत करतील व त्याची प्रत रजिष्टर पोष्टाने अर्जदारास पुरवावी. त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्यास ९० दिवसात व्दितीय अपिल या आयोगासमोर दाखल करु शकतात.

अपिल क्रमांक १९२/२०१० यामधील प्रपत्र 'अ' व अपिल क्रमांक १९२(१)/२०१० यामधील प्रपत्र 'अ' हे वेगवेगळया प्राधिकरणाकडे दाखल केले असुन मागितलेली माहिती सारखी असल्यामुळे दोन्ही अपिलाची सुनावणी एकाच दिवशी घेण्यात यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १७९९(१०६)/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
ॲड.श्री.भिवाजी संभाजी सानप,
मु.पिंपळनेर, पो.जांबुल, ता.लोणार,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, लोणार,
ता.लोणार, जि.बुलडाणा.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, लोणार,
ता.लोणार, जि.बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक १९/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी ॲड.श्री.भिवाजी संभाजी सानप हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, लोणार श्री.अ.गो. देवकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात प्रथम अपिल निकाली काढण्यात आले नाही. तांत्रिक दृष्टया प्रथम अपिल निकाली निघाल्याशिवाय व्दितीय अपिल चालत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६/११/२०१० ला प्रथम अपिलाची सुनावणी घ्यावी व सुनावणी घेतल्यानंतर १० दिवसाचे आंत आदेश पारीत करावेत. सदर प्रकरणात जे केरोसीन परवानाधारक आहेत त्यांना नोटीस काढुन अर्जदाराने मागितलेली माहिती घेवुन बोलावुन घेतील व त्याचे निरीक्षण अर्जदाराला देतील व अर्जदाराने मागितलेल्या ५ गावाची माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी. सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल निकाली काढले नसल्यामुळे अर्जदार यांना व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल करावे लागले. प्रथम अपिलाचे निर्णयानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार ९० दिवसात व्दितीय अपिल या आयोगासमोर दाखल करु शकतील.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १७९७(१०४)/ २०१०**
**अपिल क्र. १७९८(१०५)/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
ॲड.श्री.भिवाजी संभाजी सानप,
मु.पिंपळनेर, पो.जांबुल, ता.लोणार,
जि.बुलडाणा.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी,
लोणार, ता.लोणार, जि.बुलडाणा.

**२.** जन माहिती अधिकारी
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, लोणार,
ता.लोणार, जि. बुलडाणा.

**(आदेश पारीत दिनांक १९/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे ॲड.श्री.भिवाजी संभाजी सानप हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, लोणार श्री.एस.एन. कावरखे (प्रभारी) हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे कृषी पर्यवेक्षक, लोणार श्री.बि.एस. बशीरे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराचे अपिल कायदयानुसार निकाली काढले नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) नुसार अर्ज निकाली काढल्याचे दिसत नाही. अर्जदाराला दि.२१/१२/२००९ ला माहिती देण्यात आली. तसेच अर्जदाराने १ एप्रिल २००८ ते ३१ जुलै २००९ या कालावधीची माहिती मागितली. अर्जदाराचा अर्ज पाहता माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची व संदिग्धआहे. गांवनिहाय व लाभार्थी निहाय माहिती मागितेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आवश्यक आहे. अर्जदाराने दिनांक २१/१२/२००९ रोजी माहिती जाणुन-बुजून खोटी व दिशाभुल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे या सर्व बाबीची शहानिशा होणे आवश्यक आहे तसेच अर्जदाराचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) नुसार निकाली काढल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी लेखी अभिप्राय देणे आवश्यक आहे व त्यावेळी जे जन माहिती अधिकारी जबाबदार असतील त्यांचेवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तरी अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरणात दिनांक ०३/११/२००९ चे अर्जदाराचे प्रथम अपिल निकाली काढणे आवश्यक आहे व तसे संबंधित तालुका कृषी अधिकारी, ता.लोणार, जि.बुलडाणा यांनी अर्जदाराचे प्रथम अपिल आजपासून ४ आठवडयाचे आंत अर्जदाराला सुनावणी देवुन प्रत्यक्ष कागदपत्राचे निरीक्षण देवुन अर्जदाराने मागितलेली माहिती पुरवून व प्रथम अपिलात कलम १९(१) प्रमाणे आदेश पारीत करावा व त्याची प्रत अर्जदाराला पुरवावी. त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल करुन शकतील. सदर प्रकरणात याआधी प्रथम अपिलात आदेश पारीत दिनांक १३/०४/२०१० चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

वरील सुचनेनुसार पुन्हा सुनावणी घेवुन नियमानुसार योग्य तो आदेश पारीत करावा.
दिनांक १६/१०/२००९ चे प्रथम अपिल सुध्दा निकाली काढलेले नसल्याचे दिसुन येते. अपिल क्रमांक १०४/२०१० व १०५/२०१० या दोन्ही प्रकरणात एकत्रित सुनावणी घेण्यात यावी.

वरील आदेश पारीत करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १८४/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.फिरोज खान सुलेमान खान,
मंगलवारा, महात्मा फुले वॉर्ड,
उमरखेड, जि.यवतमाळ.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अकोला, जि.अकोला

२. जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अकोला, जि.अकोला

**(आदेश पारीत दिनांक १९/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे वरिष्ठ सहाय्यक, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, अकोला श्री.आर.एन. नकासकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात शिक्षणाधिकारी कार्यालय (प्राथमिक), यांचे तर्फे हजर असलेले श्री.नकासकर यांचे म्हणण्यानुसार सदर प्रकरणात अजुन माहिती पुरविली नाही . तरी, अर्जदाराला १० दिवसाचे आत अर्जदाराच्या पत्त्यावर पंजीबध्द डाकेने माहिती पुरवावी. अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली नाही किंवा माहिती मिळाली नाही तरी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेवुन जन माहिती अधिकारी व अपिलकर्ता यांचे म्हणणे ऐकुन नियमानुसार आदेश पारित करावा. अर्जदार गैरहजर असल्यामुळे अर्जदाराला माहितीची आवश्यकता आहे किंवा नाही याची शहानिशा होवु शकली नाही.

अर्जदाराला माहिती पुरविल्यानंतर अर्जदाराचे माहितीविषयी तसेच प्रथम अपिलावरील आदेशाने समाधान झाले नाही तर अर्जदाराने लेखी तक्रार या आयोगासमोर करावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**